Special Ph.D. Entrance test
Commerce
Banking & Finance

175-p3-d-upq-FH KL12 B

Con. 4981-12. **KK–1279**

(३ तास) **[ एकूण गुण : १००**

14th July, 2012

**सूचना :** (१) **उजवी**कडील आकडे गुण दर्शवितात.
(२) वर्णनात्मक उत्तरांचे **मूल्यांकन** एकंदरित गुणवत्तेवर राहिल.

## विभाग १ - (४० गुण)

सर्व प्रश्न **आवश्यक**.

१. भारतात विदेशी मुद्रानिधी (Foreign Exchange Reserves) ही खालीलपैकी कोणत्या संस्थेच्या अभिरक्षेमध्ये (Custody) असते ?
(अ) जागतिक बँक (क) भारतीय रिझर्व बँक
(ब) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (ड) पंतप्रधानांचे कार्यालय.

२. खालीलपैकी कोणत्या साधनास 'प्लॅस्टिकमनी' (Plastic Money) म्हणून संबोधले जाते ?
(अ) क्रेडीट कार्ड (क) दर्शनी धनाकर्ष
(ब) डाक अंतरण (ड) धनादेश.

३. खालीलपैकी कोणते नाव भारतीय विमा व्यवसायाशी संबंधित नाही ?
(अ) बजाज अलायन्स (क) मुद्रा प्रबंधक (Money Managers)
(ब) भारतीय विमा निगम (ड) टाटा-ए.आय.जी (Tata-AIG)

४. भारतामध्ये असंघटीत अधिकोष प्रणाली --------------- द्वारे राबविली जाते.
(अ) सावकारांद्वारे (क) शाखा प्रबंधकाद्वारे
(ब) विभागीय प्रबंधकाद्वारे (ड) टेली अधिकोषाद्वारे.

५. सुक्ष्म वित्त (व्यष्टि वित्त) (Micro-Finance) हे खालील व्यक्तीशी जोडलेले आहे.
(अ) डॉ. मोहम्मद युनुस (क) डॉ. स्टिगलीश
(ब) डॉ. सी रंगराजन (ड) डॉ. अमर्त्य सेन.

६. वित्तीय समावेशन (Financial Inclusion) म्हणजे —
(अ) बँकांचे विलीनीकरण व अधिग्रहण होणे
(ब) समाजातील खालच्या वर्गापर्यंत सेवा पोहचतील अशाप्रकारे अधिकोषीय प्रणालीचे जाळे पसरणे
(क) समाजातील वरच्या वर्गातील लोकापर्यतच अधिकोषीय सेवा प्रणाली मर्यादित असणे
(ड) सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण होणे.

७. भारत सरकारच्या पतधोरणानुसार शेतीला कर्जपुरवठा करणारी सर्वोच्च संस्था म्हणून समजली जाते—
(अ) यु.टी.आय (UTI) (क) इ.सी.जी.सी (ECGC)
(ब) नाबार्ड (NABARD) (ड) यापैकी नाही.

८. क्रिस्टीन लिगार्डे या --------------- च्या प्रबंधकीय संचालक (Managing Director) आहेत.
(अ) जागतिक बँक (क) आशिआई विकास बँक
(ब) आंतरराष्ट्रीय नाणे निधी (ड) सार्क (SAARC)

[ TURN OVER

९. भारतात म्युच्युअल फंड (Mutual Fund) हे खालील संस्थाद्वारे नियमित केले जाते.
(अ) भारतीय रिझर्व बँक (क) स्कंध विपणी
(ब) सेबी (SEBI) (ड) सेबी (SEBI) आणि रिझर्व बँक.

१०. 'विकत घ्या पैसे द्या' हे तत्त्व -------------- च्या बाबतीत लागू पडते.
(अ) डेबीट कार्ड्स् (Debit Cards) (क) इ-पर्स (E-Purse)
(ब) क्रेडीट कार्ड्स (Credit Cards) (ड) वाल्ट कार्ड्स (Vault Cards).

११. खालीलपैकी कोणती बँक सार्वजनिक क्षेत्रातील नाही ?
(अ) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (क) बँक ऑफ बडोदा
(ब) महाराष्ट्र बँक (ड) एच.डी.एफ.सी बँक.

१२. आरक्षित नगदी निधी अनुपात (CRR) आणि सांविधिक चलनिधी अनुपात (SLR) हे खालील बाबतीस लागू पडत नाही.
(अ) जमा प्रमाणपत्र (Certificate of Deposit)
(ब) चालू खात्यातील जमाशेष (Credit Balance in Current Account)
(क) लवचिक ठेव खाते (A Flexi Deposit)
(ड) वाणिज्यिक पत्र (Commercial Paper).

१३. भारतात एका ठराविक अंतराने ———— हे मौद्रिक पतधोरणाचा आढावा घेऊन त्यात सूधारणा करीत असतात.
(अ) नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष (क) केंद्रीय अर्थमंत्री
(ब) पंतप्रधान (ड) रिझर्व बँकेचे गर्व्हनर.

१४. ———— साली भारत हा आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) चा सदस्य झाला.
(अ) १९४७ (क) १९५१
(ब) १९५६ (ड) १९७२.

१५. चलनाचे अवमुल्यन म्हणजे काय ?
(अ) पैशाचे अंतर्गत मूल्य कमी होणे (क) पैशाचे अंतर्गत व बर्हिगत मूल्य कमी होणे
(ब) पैशाचे बर्हिगत मूल्य कमी होणे (ड) पैशाचे बर्हिगत मूल्य अधिक होणे.

१६. १३ व्या वित्त आयोगाचे ————हे अध्यक्ष होते.
(अ) श्री. विमल जालान (क) श्री. सी. रंगराजन
(ब) श्री. वाय. डी. रेड्डी (ड) श्री. विजय केळकर.

१७. ————बाजार हा भारतीय वित्त प्रणालींचा घटक नाही.
(अ) पूंजी बाजार (क) व्युत्पन्न बाजार/विकलज बाजार
(ब) मुद्रा बाजार (ड) अवैध बाजार (Gray Market).

१८. ————या बँकेस सरकारच्या वतीने पैसा स्विकारणे व देयकाचे शोधन करणे या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.
(अ) स्टेट बँक ऑफ इंडिया (क) युनिअन बँक
(ब) रिझर्व बँक ऑफ इंडिया (ड) सेंट्रल बँक.

१९. गैरबँकिंग वित्तीय (अधिकोषेत्तर वित्तीय संस्था) (NDFC) संस्थाना खालीलपैकी कोणते कार्य करता येत नाही ?

(अ) ठेवी स्विकारणे (क) गृहकर्जाकरीता हमी देणे
(ब) साधनांसाठी कर्ज पुरवठा करणे (ड) संपत्ती भाडेतत्त्वावर घेणे अथवा विकत घेणे

२०. खालीलपैकी कोणती जोखीम 'व्याजदर जोखिम' या प्रकारात मोडते ?

(अ) पत जोखीम (क) परिचालन जोखीम
(ब) बाजार जोखीम (ड) वरील सर्व जोखीमी

२१. 'आंतर बँकीग मागणी मुद्रा व्यवहार' म्हणजे दुसऱ्या बँकेकडून ———— दिवसाकरीता उधार घेणे होय.

(अ) एक दिवसाकरीता (क) १४ दिवसाकरीता
(ब) दोन दिवसाकरीता (ड) १४ दिवसापेक्षा अधिक

२२. वाणिज्य पत्र (Commercial Bill) बाजार हा ———— चा घटक आहे.

(अ) संघटीत मुद्रा बाजार (क) स्कंध विपणी
(ब) असंघटित मुद्रा बाजार (ड) व्युत्पन्न बाजार/विकलज बाजार

२३. 'एकदा वाहक ते नेहमीसाठी वाहक' हे तत्त्व -------- च्या करीता लागू पडते.

(अ) धनादेश (क) वचनपत्र
(ब) जमाप्रमाणपत्र (ड) ९० दिवसानंतर देय होणारे विनिमय पत्र

२४. विशिष्ट संपत्ती जसे, सोने, पैसा, प्रतिभूती इ. पासून जे मूल्य विकलजीत केले जाते, त्यास म्हणतात -

(अ) लेखाक्रयसेवा (Factoring) (क) प्रतिभूती प्राप्ती (Securitisation Receipts)
(ब) द्वैधनिधी (Hudge Fund) (ड) अनुजात किंवा विकलज (Derivative)

२५. सद्यस्थितीत भारतात पुनःखरीद दर (रेपोरेट) -------- इतका आहे.

(अ) ८% (क) ९%
(ब) ७% (ड) १०%

२६. धनादेशावरील पैशाचे भुगतान / प्रदान थांबविण्याविषयीची सूचना -------- देऊ शकतो.

(अ) आदाता (Payee) (क) आदेशक (drawer)
(ब) आदेशिती (drawee) (ड) पृष्ठांकिती (endorsee)

२७. खालीलपैकी कोणता कर हा प्रगतीशिल म्हणून समजला जातो -

(अ) आयकर (क) उत्पादन कर
(ब) विक्रीकर (ड) निर्यात कर

२८. BRIC या नामनिर्देशातील 'C' हे अक्षर (Letter) खालीलपैकी कोणत्या देशाचे निदर्शक आहे.

(अ) Canada (क) Chile
(ब) China (ड) Cuba

२९. IPO या संक्षिप्त संज्ञेचा पूर्ण विस्तार खालीलपैकी कोणता आहे ?

(अ) Indian Public offer (क) Investment Purchase Order
(ब) Initial Public offer (ड) Indian Purchase Offer

३०. खालीलपैकी कोणता निर्देशांक हा साक्षरता, राहणीमान इ. चा निर्देशक समजला जातो ?
   (अ) सेनसेक्स (Sensex)
   (ब) मानव विकास निर्देशांक (Human Development Index)
   (क) ग्राहक किंमत निर्देशांक (Consumer Price Index)
   (ड) औद्योगिक उत्पादन निर्देशांक (Industrial Production Index).

३१. वित्तीय क्षेत्रात 'PE' या संक्षिप्त संज्ञेचा पूर्ण विस्तार -------- या प्रमाणे आहे.
   (अ) Professional and Eco-friendly   (क) Private and Economical
   (ब) Profitable Equity   (ड) Private Equity.

३२. खालीलपैकी कोणती सेवा निधी आधारित सेवा (Fund Based Facility) म्हणून समजली जाते -
   (अ) पतपत्र (Letter of Credit)
   (ब) हमीपत्र (Bank Guarantee)
   (क) हमी घेणे (Underwriting)
   (ड) भांडवल व कर्जाच्या उभारणीसाठी मदत (Arrangement for Capital and debt)

३३. सद्यःस्थितीत भारतात घाऊक किंमत निर्देशांक (Wholesale Price Index) -------- इतका आहे.
   (अ) ७.५५%   (क) ९%
   (ब) ८%   (ड) १०%

३४. खालीलपैकी कोणती संस्था ही पतनिर्धारण संस्था (Credit Rating Agency) नाही ?
   (अ) मुडीज्   (क) प्राईस वाटर हाऊस
   (ब) स्टॅण्डर्डड ॲण्ड पुअर्स   (ड) इकरा (ICRA).

३५. भारतामध्ये नाणे निर्गमनाचा अधिकार कोणाकडे आहे ?
   (अ) रिझर्व बॅंक ऑफ इण्डिया   (क) स्टेट बॅंक ऑफ इण्डिया
   (ब) भारताचे अर्थ मंत्रालय   (ड) भारताचा वित्त आयोग.

३६. १२ वी पंचवार्षिक योजना ही . . . . . . . . . . पासून सुरू झाली.
   (अ) १ एप्रिल, २०१२   (क) ३१ मार्च, २०११
   (ब) ३१ मार्च, २०१२   (ड) १ जानेवारी, २०१२.

३७. भारतीय विमा निगम चे राष्ट्रीयीकरण . . . . . . . . . साली झाले.
   (अ) १९५६   (क) १९६६
   (ब) १९५७   (ड) १९७२.

३८. आतापर्यंत भारतीय रूपयाचे . . . . . . . . . इतके वेळा अवमूल्यन झाले आहे—
   (अ) १ वेळा   (क) ३ वेळा
   (ब) २ वेळा   (ड) ४ वेळा.

३९. श्रेष्ठ प्रतिभूती (Gilt edged security) ही खालील प्रतिभूतीशी संबंधीत आहे-
   (अ) सरकारी प्रतिभूती   (क) स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे निर्गमित प्रतिभूती
   (ब) ब्लूचिप कंपनी द्वारे निर्गमित प्रतिभूती   (ड) वरीलपैकी नाही.

४०. अदला बदली/विनीमय व्यवस्था (SWAP) ही संज्ञा पूढीलपैकी एका संज्ञेशी संबंधीत आहे.
   (अ) विदेशी मुद्रा विनिमय   (क) निर्यात व्यापार
   (ब) शेअर्स बाजारातील व्यवहार   (ड) मुद्रा बाजार.

## विभाग २

खालीलपैकी कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. **(१० x ३ = ३० गुण)**

१. रिझर्व बँकेच्या अलिकडील मौद्रिक धोरणावर आपली मते थोडक्यात द्या.

२. सूक्ष्म (व्यष्टि) वित्त (Micro-Finance) या संकल्पनेवर संक्षिप्त टिपण लिहा.

३. भारतीय अर्थव्यवस्थेतील विदेशी बँकांच्या योगदानाचे परिक्षण करा.

४. अल्पकालीन तरलता व्यवस्थापनाचे (Short term liquidity management) महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.

५. समांतर अर्थव्यवस्था (Parallel Economy) नियंत्रित करण्याकरिता उपाय सूचवा.

## (विभाग ३)

कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा. **(१५ x २ = ३० गुण)**

१. विकलज अथवा अनुपात (व्युत्पन्न) बाजार (Derivative market) म्हणजे काय ? या बाजाराला भारतामध्ये असणाऱ्या संधीचे विश्लेषण करा.

२. आंतरराष्ट्रीय ताळेबंद (भुगतान संतुलन) (Balance of Payment) ची व्याख्या देऊन त्याचे महत्त्व भारतासारख्या विकसनशील देशात कशाप्रकारचे आहे ते स्पष्ट करा.

३. बदलत्या परिस्थितीत भारताच्या अधिकोषिय क्षेत्राचे (Indian Banking Sector) टिकात्मक मूल्यमापन करा.

४. भारतीय पूंजी बाजार (Indian Capital Market) अधिक व्यापक व कार्यक्षम होण्याकरीता उपाय योजना सूचवा.